**वाचले** : प्रबंधक, जिल्हा न्यायालय सांगली यांची दिनांक १०/१२/२०२० रोजीची कार्यालयीन टिपणी.

## <u>प रि प त्र क</u>

ज्याअर्थी सांगली जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवर कनिष्ठ लिपीकांच्या रिक्त पदांवर तृतीय, चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांमधून नियुक्ती करणेची आहे.

त्याअर्थी सिव्हील मॅन्युअल "Appendix-A" परिच्छेद ५७७ (iii) अन्वये दिनांक १०/१२/२०२० रोजी नियमीत तीन वर्षे पुर्ण सलग सेवा झालेले चतुर्थ श्रेणी न्यायालयीन कर्मचारी, प्रमुखबेलिफ, बेलिफ, वाहनचालक, पुस्तक बांधणीकार, झेरॉक्स् ऑपरेटर हे कर्मचारी "कनिष्ठ लिपीक" पदाकरीता अर्ज करु शकतात. सदरच्या तृतीय, चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांनी अर्ज करताना खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदर कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता इयत्ता १० वी पास असणे आवश्यक आहे.

२. सदर कर्मचा-याने किमान ४० श.प्र.मि.इंग्रजी टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३. सदर कर्मचा-याने किमान ३० श.प्र.मि.मराठी टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३. सदर कर्मचा-याने एम.एस.सी.आय.टी. अथवा तत्सम शासनमान्य संगणक परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच कर्मचा-यास संगणकावर काम करणेचे ज्ञान अवगत असणे आवश्यक आहे.

तरी इच्छुक कर्मचा-यांनी आपले अर्ज ज्या-त्या कार्यालयातील न्यायीक अधिका-यांमार्फत दिनांक <u>२४/१२/२०२० रोजीचे सायंकाळी ०५-००</u> पर्यंत किंवा तत्पुर्वी जिल्हा न्यायालय सांगली येथे पोहोचतील असे पाठवावेत. दिनांक २४/१२/२०२० रोजीनंतर ई-मेल/फॅक्सद्वारे प्राप्त झालेले अर्ज, तसेच वरील पात्रता धारण करीत नसलेल्या कर्मचा-यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. सदरच्या अर्जासोबत वरील अटींची पुर्तता करणेबाबत जे कागदपत्र जोडणेत येतील त्याच्या सत्य प्रती जोडाव्यात.

सर्व नियंत्रक अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक संबंधीत सर्व कर्मचा-यांचे निदर्शनास आणून दयावे व तसा अहवाल या कार्यालयाकडे तात्काळ सादर करावा. तसेच कर्मचा-याने सादर केलेल्या माहितीची सत्यता पडताळून, त्याबाबतचा अहवाल अर्जामागे नमुद करावा व कर्मचारी पात्र असलेबाबतची खात्री करुन अर्ज या कार्यालयाकडे मुदतीत पाठविण्यात यावेत.

11.12.20

जिल्हा न्यायालय,सांगली
दिनांक : ११/१२/२०२०

**(व्ही. व्ही. पाटील)**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
सांगली.

जावक क्रमांक ६७५०/२०२०
जिल्हा न्यायालय, सांगली.
दिनांक - ११/१२/२०२०

**प्रत :-**

१. जिल्हा न्यायाधीश-१ आणि अति सत्र न्यायाधीश, इस्लामपूर.
२. मुख्य न्यायदंडाधिकारी सांगली.
३. दिवाणी न्यायाधीश व.स्तर सांगली / इस्लामपूर /विटा.
४. दिवाणी न्यायाधीश क.स्तर मिरज/तासगांव/विटा/ आटपाडी/जत/ पलुस/कडेगांव/ कवठेमहांकाळ/शिराळा.
५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर मिरज/तासगांव/विटा/इस्लामपूर.
६. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इस्लामपूर.
७. अधिक्षक, कार्यव्यवस्थापन/न्यायदान विभाग, जिल्हा न्यायालय सांगली.
८. सहा. अधिक्षक, रोख व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय,सांगली.
९. संगणक शाखा, जिल्हा न्यायालय, सांगली.
१०. कार्यालयीन प्रत.